आपत्ती व्यवस्थापन - पुणे जिल्हा पथदर्शी

आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम सन 2005 मध्ये सयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम व भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यास पुणे जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली.
आपत्कालीन यंत्रणेमध्ये सर्वात प्रथम प्रतिसाद देणारी यंत्रणा स्थानिक नागरिक हे आहेत.याचा विचार करुन ग्रामस्तरावरील आपत्ती व्यवस्थापन प्रभावी होण्याकरिता व त्याचे प्रतिबिंब जिल्हा व आयुक्त स्तरावर निर्माण होण्या करिता पुणे जिल्ह्याने खालील त्रीसुत्री कार्यक्रमाचा आवलंब केला.

१) प्रसिद्धी व जनजागृती.
२) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व क्षमता बांधणी
३) ग्राम तालुका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे

ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याकरिता प्रथम गाव आपत्ती व्यवस्थापन समितीची (Village Disastr Management Committee) स्थापना करण्यात आली.या समितीचे सदस्य म्हणून सरपंच,तलाठी,ग्रामसेवक,शिक्षक,आरोग्य सेवक,कृ षी सेवक अंगणवाडी सेविका,सहकारी संस्थातील पदाधीकारी, गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती,इत्यादींचा समावेश करण्यात आला.सदरची समिती ही धोरणात्मक पातळीवर कामकरुन संभाव्यआपत्तींचे वेळी निर्माण होणारी यंत्रणा म्हणून कार्यरत करण्यात आली.सदरसमितीचे कार्य,उदिष्टे व अधिकार यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.सर्वगटांमध्ये व समितीमध्ये महिलांचे विशेष सहभाग घेण्याचे ठरविण्यात आले.

गावा आपत्ती व्यवस्थापन आराखडा (Village Disaster Management Plan) बनविणे तसेच गावत विविध कृती गटाची निर्मीती (Village Task Force) करणे व आपत्ती व्यवस्थापन समितीने महत्व व भूमीका स्पष्ट करण्यात आली.एखादी आपत्ती येण्या पूर्वी जीवित व वित्त हानी कमि व्हावी म्हणून करावयाच्या विविध उपाययोजना, आपत्ती प्रसंगी व्यक्ती व गटाने कोणती कृती करावी त्याची जबाबदारी काय याबाबात निर्णय घेण्याचे महत्वाचे कार्य आपत्ती व्यवस्थापन समितीने पार पाडले.आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करताना माहिती संकलन करणे व पूर्व नियोजन करणे या कामी आपत्ती व्यवस्थापन समितीची मदत घेण्यात जाते.

आपत्ती व्यवस्थापन समिती मार्फत ग्रामस्थांच्या मदतीने गावात प्रत्येकी पाच विविध कृती गटांची निर्मिती करण्यात आली.प्रत्येक गटाची आपत्ती पूर्व, आपत्तीच्या वेळी आणि आपत्तीनंतर कोणती कामे करावयाची ते निश्चित करण्यात आले.

१) **पूर्व सूचना गट(Early warning team):** अतिवृष्टी , महापूर चक्रीवादळ या सारख्या आपत्ती येण्यापूर्वी हवामान खात्यामार्फत पूर्वसूचना दिली जाते. तसेच भुकंप,आगीच्या दुर्घटना , अपघात या संकटाची पूर्व सूचना मिळू शकत नाही.तेव्हा गावातील लोकांनी आपल्या गावात संदेश वहनासाठी पूर्व सूचना गटाची निर्मीती करुन बाहेरुन येणारे संदेश गावातील सर्व लोकांपर्यत पोचविणे आणि स्थानिक

पातळीवरुन बाहेर पाठवायचे या बाबतचे कार्य करणे,यासाठी वाहतूकीची साधने, संबंधितांचे फोन नंबर या बाबतची माहिती तयार करणे व साधनांची देखभाल करण्याची जबाबदारी या गटावर सोपविण्यात आली.

२) **शोध व सुटका गट(Search and Rescue Tem):** या गटातील सदस्य शारीरिकदृष्या तंदूरुस्त व धडाडीचे असावेत असे निवेदन केल.आपत्ती काळा मध्ये संकटग्रस्त लोकांची प्राथमिकतेने सुटका करणे व आपद्गस्त लोकांना सुरक्षित स्थळी हलविणे या करिता प्रशिक्षण देण्यात आले.होमगार्डस,एन.एस.एस.,एन.सी.सी.,एन.वाय,के.सिव्हील डिफेन्स या स्वयंसेवक गटांना प्राधान्य देण्यात आले.

३) **प्रथमोपचार गट (First Aid Team)** गावामध्ये शक्यतो आरोग्य सेविका व प्रथमोपचाराचे प्रशिक्षण घेतलेल्यांना प्राधान्य देण्यात आले.या मध्ये गावातील आजारी व्यक्ती, वृद्ध,अपंग,लहान मुले,गरोदर स्त्रिया इ.चियादी तयार करण्याची जबाबदारी या गटावर सोपविण्यात आली.प्रथमोपचार पेटीची देखभाल व आवश्यक औषधांची माहिती, जखमी लोकांवर उपचार करणे,डॉक्टर्स,साथीचे रोग व ते पसरण्याची कारणे आणि लसीकरण याची माहिती या गटांना देवून माहिती संकलित करण्यात आली.

४) **निवारा,पिण्याचे पाणी व्यवस्थापन गट (Water and Sanitapion team):** आपत्ती नंतर तात्पुरता कायमस्वरुपी निवारा निर्माण करण्याची वेळ येते.त्यासाठी गावातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,सांडपाणी व परिसरस्वच्छता करण्याची जबाबदारी या गटाकडे देण्यात आली.त्याच प्रमाणे निवा-याची निवड व उभारणी, निवा-यासाठी आलेल्या लोकांना अन्नपाणी व औषधीउपचाराकडे प्राधान्याने लक्ष देणे.निवा-यासाठी आलेल्या व्यक्तिची नोंद ठेवणे.पेय जल साठे प्रदूषित होणार नाही याची कायजी घेणे.जिवनाश्यक गोष्टीची पुर्तता करणे.

५) **पडझडीचे मूल्यमापन गट (Damage Assessment team)** सदर गटाने गावामध्ये आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची पहाणी करणे,पुनर्विकास प्राधान्यक्रम नुकसानी नुसार ठरविणे,जखमी व घराच्या पडझडीचा आंदाज लावणे त्याच प्रमाणे मदत पुरविणे,मदत पुरविण्यासाठी प्रशासकीय व सामाजिक संस्थाना माहिती पुरविणे .मदत पुरविण्यासाठी प्रशासकीय व सामाजिक संस्थांंना माहिती पुरविणे इ.

आपत्ती व्यवस्थापनातील अतिशय महत्वाचा टप्पा होता.या मध्ये आपत्ती व्यवस्थापन आराखड्यासंबंधि येणारी माहिती नागरीक व प्रशासनापर्यंत पोहचण्याचे महत्वाचे होते.माहितीचे संकलन करणे मोठे आव्हान हाते.आराखडे तयार करण्याकरिता सुरवातीपासून सर्व यंत्रणांशी विचार विनिमय करुन गावपातळीवरील आराखड्याचे स्वरुप त्यातील माहिती कशाप्रकारची असावी हे ठरविण्यात आले.त्यानूसार गावाचे नाव,ग्रामपंचायत,तालुका,जिल्हा स्तर प्रत्येकास संकेतांक देण्यात आला .संकलित होणा-या माहितीचे भाग पाडण्यात आले.आराखड्याचे दोन भाग करण्यात आले.

१) पहिल्या भागामध्ये तालुकास्तरावरील शासकीय अधिकारी,ग्राम आपत्ती,व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे,फोन नंबर्स,पत्ते,ग्राम आपत्ती व्यवस्थापन कृ ती गट यांची सविस्तर माहिती ,गाव पातळीवर कौशल्य असणा-या व्यक्ति,स्थानिक अशासकीय संस्था,अपलब्ध साधन

सामग्री,आपत्तीचे पूर्व इतिहास, आपत्ती येवून गेल्याची तारीख,मॉकड्रिलची तारीख इ.नमूद करण्यात आले.

२) आपत्ती व्यवसथापन आराखड्यातील दूसरा टप्पा गावात उपलब्ध असणा-या साधनांचा होता.यामध्ये लोकसंख्या,निवारा,शेत जमिन,जनावरे,रोजगाराचे स्वरुप,आरोग्य,पाणी पुरोवठा,विद्युत पुरोवठा,संपर्क यंत्रणा,वाहतूक सुविधा, शैक्षणिक सुव्विधि,साफसफाई,समाज केंद्र,पेट्रोल पंप,केरोसिन सर्च ऍन्ड रेस्क्यू साहित्य इत्यादी माहिती सांकेतिक क्रमांकासह तयार करण्यात आली. वरील सर्व माहिती ग्रामस्तरापर्यन्त तयार करुन इंडिया डिझास्टर रिसोर्स नेटवर्क(India Disaster Resources Network) चे धरतीवर संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली.यामध्ये ग्रामस्तर,तालुका स्तर,व जिल्हा स्तरावर प्रत्येक गावाची माहिती उपलब्ध सामग्री व त्याचा उपयोग आपत्ती प्रसंगी करता येवू लागला.सदर संगणक प्रणालीस पुणे डिझास्टर रिसोर्स नेटवर्क असे संबोधण्यात आले.

आपत्ती व्यवस्थापन पुणे जिल्ह्यामध्ये ग्राम स्तरावरील कार्यक्रम यशस्वीपणे राबविताना पुणे जिल्ह्यातील 1404 गावांमध्ये गाव आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येऊन 1405 ठिकाणी आराखड्याचे रंगीत तालीम घेण्यात आली.जिल्ह्यामध्ये 1200 आपत्ती व्यवस्थापन गटाची स्थापना करण्यात येऊन 30,000/- स्वयंसेवक व 25000/- आपत्ती व्यवसथापन समितीचे सदस्य यांना मंडल स्तरावर आपत्ती व्यवस्थापन या विषईची माहिती देण्यात आली.जनजागृती करीता जिल्हा,तालुका,व ग्राम स्तरावर,600/- ठिकाणी वॉल पेंटीग,टिव्ही,.एस.एम.एस.,पथनाट्य इत्यादीचा वापर करण्यात आला.पुणे जिल्ह्यातून निघणारी लोकजागृती करण्यात आली.गाव आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी गाव पातळीवर आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शक (Village Disaster Management Information Book) पुस्तिकेची निर्मीती करण्यात आली आहे.पुणे जिल्ह्याची आदर्श कार्यान्वित प्रमाणित पद्धती (Standard opearation Procedure) तयार करण्यात आली.

जिल्हा स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करुन 24 तास कार्यरत ठेवण्यात आला.जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष एम.एस.प्रकल्पांतर्गत मंत्रालय,सर्व जिल्हे व जिल्ह्यातील तालुके यांन जोडण्यात आले.नियंत्रण कक्षामध्ये जिल्ह्याकरिता टोल फ्री क्रमांक 1077 ची स्थापना करण्यात आली.तसेच कक्षामध्ये इंटरनेट,फॅक्स फोन व प्रशिक्षित कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली.जेणे करुन संदेशाची देवणघेवाण जलद होते.जिल्हा व तालुका स्तरावर आर्दश कार्यान्वित पुस्तिका तयार करण्यात आली.त्यामध्ये संबं्धित विभागाने आपत्ती पूर्व,दरम्यान,व नंतरच्या काळात प्रतिसाद देण्याची प्रणाली ठरवून देण्यात आली.जिल्हा स्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली व राज्य प्राधिकरणाच्या सल्ला व मार्गदर्शन तत्वे व उद्दिष्टानुसार कार्यवाही करण्याचे काम करण्यात आले.आपत्ती व्यवस्थापन आराखडा आद्ययावत करण्यात आले.जिल्ह्यातील धोकादायक रासायनिक कारखान्यांकरिता विशेष आराखडा संचालक

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्या मार्फत तयार करुन राबविण्यात आला.कारखान्यांमध्ये मॉकड्रिलचे आयोजन करण्यात येऊन नागरिकांचा सहभाग घेण्यात आला.

पुणे जिल्ह्यामध्ये राबविलेल्या कार्यक्रमाची केंद्रीय स्तरावरील अधिका-यंानी माहिती घेवून व मूल्यांकन करुन सदरचा प्रकल्प मध्यप्रदेश,छत्तीसगढ येथे राबविण्या विषयी चर्चा केली होती.

8) आय.डी.आर.एन (IDRN)

आपत्ती प्रसंगी शोध व बचाक क ार्य तत्पर्यतेने सुरु व्हावे व उपलब्ध साधन सामग्रीचा योग्य प्रकारे वापर करता यावा या दृष्टीने केंद्रीय गृह मंत्रालयाच्या www.idrn.gov.in वेबसाईट वर आपत्ती प्रसंगी मदत कार्यात आवश्यक असणा-या विविध 182 प्रकारच्या उपकरणांच्या उपलब्धतेबाबत माहितीचा समावेश करण्यात आलेला आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्ह्यातील विविध शासकीय निमशासकीय व खाजगी संस्थांकडे उपलब्ध असलेल्या विविध प्रकारचा साधन सामग्रीची माहिती या बेवसाईट वर उपलब्ध करुन देण्यात आली असून जिल्ह्यातील आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडतील अश्या विविध उपकरणांची माहिती व वेबसाईट वर उपलब्ध आहे.तसेच आपत्ती प्रसंगी शेजारील जिल्हे, राज्य व संपूर्ण देशातील साधन सामग्रीची माहिती या बेवसाईटवर आपणास उपलब्ध होवू शकते.

9) जिल्हा नियंत्रण कक्षाअंतर्गत उपलब्ध साधनसामुग्री :

आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त साधन सामुग्री जिल्हा नियंत्रण कक्षात उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे.आपत्कालीन परिस्थितीमध्ये सदर साधन सामुग्री वापराबद्दल सर्वांना सुचना देण्यात आल्या आहे.तसेच शो ेध व बचाक पथकातील सदस्यांना या बाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.सन 2005 मध्ये जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर परिस्थिती दरम्यान सदर साधन सामुग्रीचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला व 567 लोकांना चार बोटीद्वारे सुरक्षित स्थळी हालविण्यात आले.

अ.क्र.	साहित्याचे नाव	संख्या	अ.क्र.	साहित्याचे नाव	संख्या
1	रबर बोट	04	2	जीवन रक्षक जॅकेट	37
3	लाईफ बोयाज (रिंग)	24	4	नायलॉन रोप	04
5	प्रथमोपचार पेटी	04	6	गॅस कटर	04
7	करवत (60एमएम)	04	8	नोज मास्क	08
9	हातोडे (10 किलो)	08	10	सेफ्टी व्हेट्स	04
11	की होल सॉ	04	12	बॅटरी (ड्राय सेल)	04

पुणे महानगर पालिका क्षेत्रातील पाण्यामुळे बाधित होणारे क्षेत्र

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील पाण्यामुळे बाधित होणारे क्षेत्र

विसर्ग प्रमाण व पूराच्या पाण्याचा धोका असलेल्या, बाधित लोकवस्ती हलविण्याचा परिसर

खडकवासला धरणातील मुठा नदीचा विर्सग:

विर्सग प्रमाण 40,000/- क्युसेक्स पर्यन्त = सावधानीचा इशारा

विर्सग प्रमाण 50,000/- क्युसेक्स पर्यन्त = कार्यवाही सुरु

विसर्गात अंदाजे बाधीत होणारा भाग

मुठा नदी डावा किनारा विर्सग प्रमाण

१. कोंढवे - धावडे,भिमनगर,समाज मंदिर ओढ्यालगतचा भाग 55,000 पुढे
२. न्यु कोपरे इंद्रीजवळ 55,000 पुढे
३. उत्तमनगर इंदिरावसाहत 50,000 पुढे
४. शिवणे नदी लगतचा भाग 55,000 पुढे
५. वारजे तपोधाम 55,000 पुढे
६. दिवणी मेटल वर्कस एरंडवणा खिलारे वस्ती 40,000 पुढे
७. पुलाची वाडी डेक्कन जिमखाना 35,000 पुढे
८. पीएमटी टर्मिनल्स डेक्कन जिमखाना मागील बाजू 40,000 पुढे
९. तोफखाना परिसर शिवाजीनगर 40,000 पुढे
१०. कामगार पुतळा शिवाजीनगर 30,000 पुढे

मुठा नदी उजवा किनार

11.नांदेड नदी लगतचा भाग 55,000 पुढे
12.वडगाव बुद्रुक स.नं. 14व 15 55,000पुढे
13.हिंगणे खुर्द स.नं.18 55,000पुढे
14.हिंगणे अंलकार पोलीस चौकी जवळील भाग कर्वेनगर रस्ता 55,000 पुढे
15. पुना हॉस्पिटल पिछाडी नदी लगतचा भाग 45,000पुढे
16.सिताबाग कॉलनी नारायण पेठ 45,000पुढे
17. अष्ट भुजा मंदीर नारायण पेठ 45,000पुढे
18.अमृतेश्वर मंदिराजवळील भाग शनिवार पेठ ओटा घाट नेने घाट 45,000पुढे
19. शेख सल्ला दर्ग,डेंगळे पुल कसबा पेठ, 45,000पुढे
20.मनपा वसाहत कसबा पेठ 45,000पुढे
21.बारणे रोड मनपा वसाहत मंगळवार पेठ 45,000पुढे
22.गाडीतळ झोपडपट्टी भिमानगर मंगळवार पेठ 45,000पुढे
23.ताडीवाला रस्ता झोपडपट्टी परिसर 45,000पुढे

24.अंबिल ओढा लगतचा भाग	45,000पुढे
25.दत्त वाडी व राजेद्रनगर	55,000पुढे
26.काशेवाडी झोपडपट्टी, सोनवणे हॉस्पीटल जवळ,	नाल्यातील बांॅक वॉटर
27.इंदिरानगर झोपडपट्टी महर्षी नगर	खाणीतील भाग

मुळा नदी लगतचा भाग

मुळानदीतील पाण्यातील पातळी बंडगार्डन पुलावरील धोका पातळीच्यावर असल्यास पुणे मनपा हद्दीतील मुळा नदी काठी वरील झोपडपट्टी / नागरी वस्ती व बाधित होतात.

28.कळस - स.न.6 व 88 ओढ्या किनारची झोपडपट्टी, नदीकाठावरील व ओढ्या लगतचा भाग

29. येरवडा - शांतीनगर स.न.111 टँक रोड स्मशान भूमी परिसर

30. येरवडा -इंदिरानगर झोपडपट्टी आळंदी रोड व.स.न.10

31. येरवडा - सादलबाबा दर्ग्याजवळचा भाग

32.औंध -जुन्या पुलाजवळील भाग

33.बोपोडी - स.न.7 हॅरिस पुलाजवळील झो.पट्टी

34.संगमवाडी - नाईल बेटा लगतचा संगमवाडीचा भाग

35.मुळा रोड - झो. पट्टीचा भाग

36. शिवाजीनगर - पाटील इस्टेट झो.पट्टील भाग

इतर भाग

37.मुंढवा - केशव नगर,भिसे दत्तमंदिर परिसर

38.धनकवडी -के.के.मार्केट

39. स्वारगेट - स्वारगेट कॅनॉल लगत नाल्यालगतची वस्ती.

पुणे शहरातील नाले

१) आंबील ओढा - कात्रज मार्गेते वैकुंठ स्मशान भुमी-मुठा नदी के.के.मार्केट-धनकवडी,पद्मावती पुल,आंबील ओढा झोपडपट्टी(दांडेकरपुल),पुरग्रस्त वसाहत दत्तवाडी स.न.94 आंबेडकर वसाहत(पर्वती)

२) पर्वती स.न.120/121 - पर्वती हिला मार्ग नदी सिंहगड रोड जवळ पर्वती स.नं.120/121

३) कर्वेनगर नाला-एम.आय.टी.मार्गेते कोथरुड गावठाणा ते एरडवंणा(रजपुत झोपडपट्टी)नदी बाधीत क्षेत्र- साईनगर झोपडपट्टी ते रजपुत झोपडपट्टी

४) फर्ग्युसन कॉलेज नाला -

५) गोखलेनगर बाधीत नाला - गोखलेनगर मार्गेत पाटील इस्टेट मुळा रोड भैयावाडी झोपडपट्टी

६) गुलटेकडी स्वारगेट नाला - गुलटेकटी स्वारगेट मार्गेते भवानी पेठ ते कसबा पर्पिग स्टेशन मुठा नादीस बाधीत क्षेत्र-लोहीया नगर पूर्व कासेवाडी रास्ता पेठ मंगळवार पेठ(कागदी पुरा) ते मुठा नदीस

७) कॅन्टोमंन्ट नाला -पुणे कॅन्टोमेंन्ट मार्गेत संमगब्रीज
बांधीत क्षेत्र - कसबा पेठ,मंगळवार पेठ,सोमवार पेठतील काही भाग

८) पाषाण बोपोडी नाला -

९) विश्रांतवाडीनाला -विश्रातवाडी फुलेनगर मार्ग ते कस्तुरबा ते मुळानदी बाधीत श्रेत्र - शासकीय जागेवरील दोन झोपडपटट्यातील काही भाग

१०) हडपसर मुंढवा -

११) भैराबा नाला - कोंढवा मार्ग ते वानवडी -पुणे कॅन्टोमेंन्ट मार्ग कोरेगाव पार्क

१२) फुरसंुगी हडपसर नाला -

पिंपरी-चिंचवड महानगरपालीका क्षेत्रीय पाण्यामुळे बाधित होणारे क्षेत्र व ठिकाणे

प्रभाग	बाधीत भाग	मदत शिबिराचे ठिकाण
ब	बौध्द नगर,भाट नगर,मिलिंद नगर,आंबेडकर कॉलनी,रमाबाई नगर,रमाबाई नगर	१) कमला नेहरु हिंदी सिंधी शाळा ,पिंपरी २) केशवनगर शाळा,चिंचवड ३) बौध्द नगर ,पिंपरी ४) सांस्कृतीक भवन,भाटनगर,पिंपरी ५) रमाबाई आंबेडकर दवाखाना,भाटनगर,पिंपरी
क	प्रवार वस्ती,गुलाब नगर-दापोडी,रतिकलाल भगवान दास वसाहत,आनंदवन आश्रम,हॉटेल अशोग परिसर - फुगेवाडी,हिराबाई लांडगे झोपडपट्टी,कासरवाडी	१) मनपा प्राथमिक शाळा ,बोपखेल २) हुतात्मा भगतसिंग प्राथ,विद्यालय,मुले.क्र.दापोडी ३) लोकमान्य टिळक विद्यालय,फुगेवाडी ४) छत्रपती शाहूमहाराज प्राथ.विद्यालय,कासारवाडी
ड	सांगवी मुळा नगर,संगम नगर,आनंद नगर,मधुबन सोसायटी,पंचशिल नगर,शिक्षक सोसायटी,पिंपळे गुरव,कस्पटे वस्ती,संजय गांधी नगर(पिंपरी)	1)अहिल्यादेवी होळकर शाळा, सांगवी 2) मनपा शाळा, रहाटणी कमला नेहरु हिंदी सिधी शाळा पिंपरी 3) मनपा शाळा,पिंपळे गुरव व पिंपळे सौदागर 4) पिंपळे निलख प्राथमिक शाळा

सन 2007 -बाधीत भाग व स्थलांतरित ठिकाणी

अ.क्र.	बाधीत भाग	कुटुंब संख्या	व्यक्तींची संख्या	मदत शिबिराचे ठिकाण
1	संजय गांधी नगर	57	284	कमला नेहरु शाळा,पिंपरी
2	सुभाष नगर	19	111	गोगा देवधर्म शाळा , झुलेलाल मंदिरा शेजारी, पिंपरी कॅम्प
3	बौध्द नगर,आंबेडकर नगर	104	503	लक्ष्मी धर्मशाळा, पिंपरी कॅम्प
4	बौध्द नगर,भाट नगर	55	155	भाटनगर ,कमला नेहरु शाळा
5	बौध्द नगर,भाट नगर	66	159	शिला साबळे समाज मंदिर,भाटनगर
6	रमामाता नगर ,भाट नगर	39	72	भाटनगर समाज मंदिर,opd इमारती मागे
7	बौध्द विहार,बौध्द नगर	03	16	बौध्द नगर, भाट नगर
8	मुळा नगर झोपडपट्टी, आनंद नगर झोपडपट्टी	192	927	आहिल्या देवी होळकर मनपा शाळा,जूनी सांगवी
9	आनंद नगर झोपडपट्टी सांगवी	44	187	नृरसिंह हायस्कूल,जुनी सांगवी
10	लक्ष्मी नगर,पिंपळे गुरव	20	76	मनपा शाळा, पिंपळे गुरव
11	प्रियदर्शनी नगर,जुनी संगवी	47	210	राधा कृष्ण मंदिर,प्रियदर्शनी नगर,गल्ली क्रमांक 1
12	PWD कॉलनी समोर झोपडपट्टी	63	175	टण्णु शाळा, पिंपळे निलख
13	पवनानगर,संगम नगर,सांगवी	30	150	नॅशनल स्कूल, जुनी संगवी
14	पंचशील नगर, शिक्षक सोसा. पिंपळे निलख	12	66	मनपा. शाळा, पिंपळे निलख
15	कस्पटे वस्ती,वाकड	11	70	मनपा. शाळा, कस्पटे वस्ती
	एकूण	762	3161	

दिनांक	प्रभागाचे नाव	बांधीत भाग	कुटुबांची	बाधीत	स्थलांतर केलेले ठिकाण
14/07/1009	ड प्रभाग	मुळा नगर,संगवी	31	162	अहिल्यादेवी प्राथमिक शाळा ,सांगवी
16/07/2009	ब प्रभाग	सुभाष नगर,पिंपरी	16	77	वीर गोगादेव मंदिर सुभाषनगर
		रमाबाई नगर	08	40	समाज मंदिर,भाटनगर
		बांधै नगर	04	20	कमला नेहरु शाळा,भाटनगर
		रमाबाई नगर,रावेत सेक्टर क्रमांक 29	29	116	खाजगी मोकळ्या जागेत (निवाऱ्यात)

दिनांक 29/08/2011 रोजी पवना धरणातून 13729 क्यसेक्स पाणी सोडलेनंतर पिंपरी-चिंचवड मपना हद्दीतील बाधित भागांची माहिती.

बांधीत भाग	**स्थलांतरित कुटंुबाची संख्या**	**स्थलांतरित केलेले ठिकाण**
ब प्रभाग संजय गांधी	199 कुटुंबे	कमला नेहरु शाळा,लक्ष्मी धर्मशाळा,सुभाष नगर,भाटनगर,लाल बहादुर शास्त्री शाळा,वीर गोंगादेव मंदिर भाटनगर समाज मंदिर,पिंपरी
ड प्रभाग मुळा नगर	39 कुटंुबे	अहिल्यादेवी प्राथमिक शाळा,सांगवी झोपडपट्टी
एकूण	**238 कुटुंबे**	